आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२० जून २०२४ - गुरुवार

वाढवण बंदर प्रकल्प हा भारताच्या भविष्यासाठी अतिशय महत्वाचा प्रकल्प असून यामुळे राज्याच्या जीडीपीमध्ये एक टक्के वाढ होईल, असा विश्वास जेएनपीए अर्थात जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणचे प्रमुख उन्मेष वाघ यांनी व्यक्त केला. ते मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. कंटेनर वाहतुकीसाठी मुंद्रा आणि जेएनपी या बंदराची क्षमता कमी पडत असून यासाठी वाढवणसारख्या बंदराची गरज आहे. या बंदरानंतर पश्चिम भारताला नव्या बंदराची गरज उरणार नाही, तसंच मुंबईचं महत्त्व अबाधित राहील असं वाघ म्हणाले.

वाढवण बंदरासाठी जमीन अधिग्रहित केली जाणार नाही, त्यामुळे पालघर भागातल्या लोकांचं विस्थापन होणार नाही. तसंच या प्रकल्पामुळे मच्छिमारांच्या व्यवसायावर कोणताही परिणाम होणार नाही, असं त्यांनी स्पष्ट केलं. वाढवण बंदर प्रकल्प हा पर्यावरणपूरक प्रकल्प असल्याचंही त्यांनी सांगितलं. तसंच या प्रकल्पामुळे दहा लाख नोकऱ्या निर्माण होतील असंही वाघ यांनी सांगितलं.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आजपासून दोन दिवसांच्या जम्मू-काश्मीर दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यात ते ८४ विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन करणार असून उद्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त होणाऱ्या कार्यक्रमात ते सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमात सुमारे ७ हजार नागरिक सहभागी होण्याची शक्यता आहे.

<><><><><>

आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्त सर्वत्र विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. नांदेड जिल्हा प्रशासनाच्या वतीनं उद्या सकाळी साडेसहा वाजता श्री गुरुग्रंथ साहिबजी भवन एनआरआयच्या बाजुला असलेल्या हिंगोली गेट इथं योगदिनाचा कार्यक्रम होणार आहे. यावेळी नांदेड जिल्हयातल्या विविध योग

समित्या, योग प्रशिक्षक आणि आयुष मंत्रालयाचे प्रतिनिधी यावेळी मार्गदर्शन करणार आहेत.

<><><><><>

सरकारनं यूजीसी-नेट जून २०२४ परीक्षा रद्द केली आहे. ही परीक्षा नव्यानं घेण्यात येणार असून, त्याबाबतची माहिती स्वतंत्रपणे कळवली जाणार आहे. भारतीय सायबर गुन्हे गुप्तवार्ता केंद्राकडून परीक्षा यंत्रणेत गैरप्रकारांच्या शक्यतेबाबत माहिती मिळाल्यानंतर परीक्षा रद्द करण्यात आली आहे. या प्रकरणी सीबीआयकडे तपास सोपवण्यात आला आहे.

नीट परीक्षेत झालेला गोंधळ  ताजा असताना नेट परीक्षा रद्द करण्याचा प्रकार म्हणजे सरकारच्या अकार्यक्षमतेचा आणखी एक नमुनाच असल्याची प्रतिक्रिया राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं दिली आहे.

<><><><><>

यंदाच्या नीट अर्थात राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षेशी निगडित उच्च न्यायालयांमध्ये प्रलंबित सर्व खटले सर्वोच्च न्यायालयाकडे हस्तांतरित करण्याची मागणी करणाऱ्या राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या याचिकेसंदर्भात सर्वोच्च न्यायालयानं आज संबंधितांना नोटीस बजावली. तसंच सर्वोच्च न्यायालयानं विविध उच्च न्यायालयांमध्ये सुरू असलेल्या नीट संदर्भातल्या सर्व कार्यवाहीला स्थगिती दिली आहे. न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती एसव्हीएन भट्टी यांच्या पीठानं हे निर्देश दिले. या सर्व याचिकांवरची सुनावणी येत्या ८ जुलैला होईल.

<><><><><>

मराठा आणि ओबीसी समाजाच्या मागण्यांबाबत विचार करण्यासाठी  केंद्र सरकारनं पुढाकार घेण्याची गरज असल्याचं प्रतिपादन राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ज्येष्ठ

नेते शरद पवार यांनी आज बारामती इथं केलं. ते पत्रकार परिषदेत बोलत होते. या समाजांच्या आंदोलनांमुळं सामाजिक तणाव निर्माण होऊ नये म्हणून केंद्र सरकारनं काळजी घ्यावी, असं पवार यांनी यावेळी सुचवलं.

<><><><>

पाटणा उच्च न्यायालयानं बिहारमधलं ६५ टक्के वाढीव आरक्षण आज रद्दबातल ठरवलं आहे. हे आरक्षण लागू करणारा बिहार आरक्षण कायदा समता विरोधी असल्याचं सांगून उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींच्या नेतृत्वाखालील दोन न्यायाधीशांच्या खंडपीठानं रद्द केला. सर्वोच्च न्यायालयानं निर्धारित केलेल्या ५० टक्के आरक्षणाच्या मर्यादेत बदल करून बिहार सरकारनं सरकारी नोकऱ्या आणि शिक्षण संस्थांमधलं आरक्षण ६५ टक्क्यांपर्यंत वाढवलं होतं. त्याला अनेक संघटनांनी उच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं.

<><><><>

आयसीसी टी-ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज सुपर एटमधील ग्रुप एकमध्ये भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात सामना होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री आठ वाजता बार्बाडोसमधील ब्रिजटाऊनच्या केन्सिंग्टन ओव्हल इथं हा सामना सुरू होणार आहे.

<><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या वाढदिवसानिमित्त उपराष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी राष्ट्रपतींच्या निवासस्थानी भेट देउन त्यांना निरोगी आणि आनंदी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. तर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रपती मुर्मू यांना समाजमाध्यमावरल्या संदेशाद्वारे शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

राज्याच्या अनेक भागात आज सकाळपासून पावसाला सुरुवात झाली असून पालघर मध्ये काल रात्रीपासून मुसळधार पाऊस पडत आहे. पावसामुळं पालघर जिल्ह्यातल्या सुर्या, वैतरणा, देहर्जा नद्या ओसंडून वाहात असून प्रशासनानं नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. रायगड, रत्नागिरी, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांना पावसाचा यलो अर्लट जारी करण्यात आला आहे.

**//<><><><><>//**